नि.दि.दावा क्र.२२३/२००६.
शालन उर्फ आकाताई यादव विरुध्द
वसंत पाटील.

## निशाणी क्र.१२४ कडील आदेश

प्रतिवादी याने सदरच्या अर्जाद्वारे त्याचेविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' व 'पुरावा बंदचा' आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

२. अर्ज वाचला. अर्जातील कथनांप्रमाणे, वादी यांचा उलटतपास घेण्यास प्रतिवादी क्र.१ यास परवानगी मिळावी जर अशा स्वरुपाची परवानगी दिली गेली नाही तर प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे व प्रतिवादी क्र.१ यास त्याचे कायदेशीर हक्कापासून कायमपणे वंचित होण्याची पाळी येणार आहे. वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याच्या दृष्टीने व उभय पक्षातील वाद विषय कायमस्वरुपी संपुष्टात येणेसाठी या प्रतिवादीचा पुरावा दाखल करुन घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने हरकत घेतली असुन अर्ज खोटा असुन वादी यास मान्य नाही. वादीस त्रास देणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

४. प्रतिवादीविरुध्द पुरावा बंदचा आदेश दिनांक २०/०८/२०१९ रोजी करण्यात आलेला आहे. दिनांक २६/०८/२०१९ रोजी असा कोणताही आदेश केलेला नाही. तसेच निशाणी ५८ कडे वादी क्र.२ चा उलटतपास प्रतिवादीने नोंदविलेला आहे. या प्रतिवादीविरुध्द 'उलटतपास नाही' असा कोणताही आदेश झालेला नाही. प्रतिवादींनी नमूद तारखांना त्यांचा पुरावा का दिला नाही याचे कोणतेही कारण अर्जात नमूद नाही. अर्जातील मजकूर संदिग्ध असून तो संयुक्तिक नाही. सबब वरील सर्व कारणांस्तव अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

अर्ज (नि.१२४) नामंजूर करण्यात येत आहे.

दिनांक :– ०५/११/२०१९.
करा‍ड.

(आरती कुलकर्णी)
६वे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.